# पुरुषांच्या मानसिक आरोग्याच्या समस्यांमध्ये वाढ

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** : देशात २०२२मध्ये झालेल्या आत्महत्यांमध्ये ७२ टक्के पुरुष होते. पुरुषांमधील वाढत्या मानसिक आरोग्याच्या समस्यांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केले जाते, असे निरीक्षण तज्ज्ञांनी व्यक्त केले असून, याबाबत त्यांनी चिंता व्यक्त केली आहे. पुरुषांना अनेकदा आपले दुःख दाबण्याची, असुरक्षितता लपवण्याची सवय लावली जाते. पुढे याचे परिणाम अत्यंत भयानक होतात, असे मानसोपचारतज्ज्ञ ज्योती कपूर यांनी म्हटले आहे. हरियाणाच्या ग्रामीण भागात केलेल्या अभ्यासात असे दिसून आले की, ५२.४ टक्के विवाहित पुरुषांना हिंसाचाराचा सामना करावा लागतो. यात बहुतेकदा त्यांना कायदेशीर मदत किंवा मानसिक आधारही मिळत नाही. २०१३-१४च्या एका अभ्यासात, त्या काळात दाखल झालेल्या बलात्काराच्या ५३.२ टक्के तक्रारी खोट्या होत्या, असे लक्षात आले आहे. त्यामुळे मानसशास्त्रज्ञ आणि कायदेतज्ज्ञांमध्ये या खोट्या पुरुष आरोपींवर होणाऱ्या मानसिक परिणामाबद्दल चिंता निर्माण झाली आहे, असे मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रीती सिंग म्हणाल्या. बहुतेकदा पुरुष एकटेच दुःख सहन करतात. त्यामुळे आपली समाजव्यवस्था लिंग-तटस्थ, निष्पक्ष आणि भावनिकदृष्ट्या समृद्ध बनली पाहिजे. पुरुषांच्या वेदना रुढीवादी कल्पनांनी झाकून टाकणे थांबायला हवे. याबाबत पुरुषांशी बोलणे आणि त्यांना दुःख दाबून ठेवणे मानसिक आरोग्यासाठी हानिकारक असल्याचे सांगणे आवश्यक असल्याचे डॉ. प्रीती सिंग म्हणाल्या आहेत.

हॅलो डॉक्टर कर्ज योजना
किफायतशीर व्याजदर 8.25%*
टर्मलोन/वर्किंग कॅपिटल स्वरुपात
*अटी लागू. (ROI p.a.)
कॉसमॉस को-ऑप. बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक) जीवन करा समृद्ध!
Toll Free No.: 1800 233 0234

डॉ. मानसी Tanvi HERBALS
डॉ. मानसी मेहेंदळे
डॉ. पुष्कराज धामणकर
तन्वीतेज पंचकर्म सेंटर घंटाळी ठाणे
मोफत नाडीपरीक्षण
मोफत आयुर्वेदिय सल्ला
आपल्या सर्व जुनाट दुखण्यांवर तज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन घ्या
9833683021 अपॉइंटमेंट आवश्यक

# पंतप्रधान ई-बस योजनेंतर्गत नांदेडच्या नशिबी भोपळा

## पाच खासदार, नऊ आमदार असूनही उपेक्षाच

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** केंद्र सरकारने देशातील विविध शहरांना पंतप्रधान ई-बस योजनेच्या अंतर्गत पर्यावरणपूरक बसेस पुरवल्या आहेत. महाराष्ट्रातील २२ शहरांचा यात समावेश आहे. मराठवाड्यातील लातूर, परभणी या शहरांना या योजनेचा लाभ मिळाला. परंतु नांदेडला यातून वगळण्यात आले. जिल्ह्यात राज्यसभेचे दोन, लोकसभेचा हक्काचा एक व अर्ध्या हक्काचे दोन असे पाच खासदार व नऊ आमदार आहेत. तरीही नांदेडच्या नशिबी विविध बाबतीत उपेक्षाच दिसून येते.

केंद्र सरकारने १६ ऑगस्ट २०२३ रोजी पीएम ई-बस सेवा योजनेच्या माध्यमातून देशातील १६९ शहरांत १० हजार ई-बसेस चालवण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात महाराष्ट्रातील २२ शहरांचा समावेश करण्यात आला. त्याचवेळी नांदेडचा त्यात समावेश होणे अभिप्रेत होते, परंतु त्याचवेळी डावलले गेले. शिवाय नांदेड शहरात सिटी बस सेवा उपलब्ध नाही. खासदार अशोकराव चव्हाण मुख्यमंत्री असताना बंद पडलेली शहर बस वाहतूक सेवा सुरू करण्यात आली होती. त्यावेळी जेएनयूआरएम या केंद्राच्या योजनेतून ३६ लहान-मोठ्या बसेस उपलब्ध झाल्या होत्या. परंतु काही काळ चालल्यानंतर त्या बंद पडल्या. खराब झालेल्या बसेस पुन्हा दुरुस्तच झाल्या नाहीत. अशोक चव्हाण, अजित गोपछेडे, रवींद्र चव्हाण, डॉ. शिवाजी काळगे आणि नागेश पाटील आष्टीकर असे पाच खासदार नांदेड जिल्ह्याशी संबंधित आहेत. मात्र, पीएम ई-बस योजना काही जिल्ह्यांत सुरू झाली नाही.

जिल्ह्यात नऊ आगार आहेत. त्यात नांदेड, किनवट, मुखेड, देगलूर, कंधार, हदगाव, बिलोली, माहूर व भोकर या तालुक्यांचा समावेश आहे. पैकी भोकर वगळता अन्य ठिकाणी चार्जिंग स्टेशन उभारणीचे काम सुरू आहे. पण केवळ नांदेड येथील काम पूर्ण झाले असल्याचे एस.टी. जिल्हा नियंत्रक चंद्रकात वडतकर यांनी सांगितले.

### वातानुकूलित ई-बसेसची गरज



भोकर वगळता अन्य ठिकाणी कामे प्रगतिपथावर असून येत्या काळात सर्वत्र चार्जिंग स्टेशन्स उपलब्ध होतील. पण, सद्यःस्थितीत जिल्ह्यात इलेक्ट्रीक बसेस उपलब्ध नाहीत. पीएम ई-बस योजनेत सर्व बसेस पर्यावरणपूरक असून वातानुकूलित आहेत. त्यामुळे त्याची मागणी आहे. पण नांदेड जिल्ह्यात बस आल्या नाहीत.

# 'सामाजिक न्याय विभागाचा निधी वळविणे गुन्हाच'

**लोकसत्ता, वार्ताहर**

**जालना :** राज्यातील सामाजिक न्याय विभागाचा निधी लाडकी बहीण योजनेकडे वळविणे हा गुन्हा आहे, असा आरोप रिपब्लिकन सेनेचे अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांनी येथे केला.

'अनुसूचित जाती-जमातींसाठी अर्थसंकल्पात तरतूद केलेल्यापैकी साडेसात हजार कोटी रुपये अन्यत्र वळविल्याचे संबंधित मंत्र्यांनाही माहीत नसेल तर ते योग्य नाही. हा निधी वळविण्याची चर्चा मंत्रिमंडळ बैठकीत होत नसेल आणि दोन-तीन जणच असा निर्णय घेत असतील तर ते दुर्दैवी आहे. राज्याच्या मंत्रिमंडळात एकजीनसीपणा आहे की नाही, हाही प्रश्नच आहे असेही आंबेडकर म्हणाले.

# परभणी जिल्ह्यात शंभर लघु, मध्यम अन्नप्रक्रिया उद्योग

## पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांचे आश्वासन

**लोकसत्ता वार्ताहर**

**परभणी :** जिल्ह्याला काळी कसदार व सुपीक जमीन तसेच सिंचनाच्या सुविधा असतानाही जिल्ह्यातील शेतकऱ्यांचे जीवनमान पुरेसे समाधानकारक नसल्याची खंत आहे. हे चित्र बदलण्यासाठी येत्या काळात जिल्ह्यात लघु व मध्यम स्वरूपाचे किमान शंभर अन्न व फळप्रक्रिया उद्योग उभारले जातील, असा संकल्प बाळगून या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्न केले जातील, असे आश्वासन पालकमंत्री श्रीमती मेघना साकोरे- बोर्डीकर यांनी दिले.

येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या ५३ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शेतकरी मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी श्रीमती बोर्डीकर बोलत होत्या. कार्यक्रमास निवृत्त विभागीय आयुक्त डॉ. उमाकांत दांगट यांच्यासह कुलगुरू डॉ. इंद्र मणी, दादा लाड, विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागाचे संचालक आर.डी अहिरे, बी.डी.आसेवार, खिजर बेग, कुलसचिव संतोष वेणीकर, जिल्हा कृषी अधीक्षक दौलत चव्हाण, कृषी विद्यापीठातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

'जिल्ह्यात विविध फळांपासून तसेच शेतमालापासून अन्न व फळ प्रक्रिया उद्योग उभारणी करण्याचा मानस आहे. टास्क फोर्सच्या माध्यमातून शंभर गावे दत्तक घेतली गेली असून या गावांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत. विद्यापीठाच्या वतीने पाचशे शेतकऱ्यांना दत्तक घेऊन त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.' असे बोर्डीकर म्हणाल्या.

कृषी विद्यापीठाच्या वतीने खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर विविध बियाणे विक्रीसाठी ठेवली जातात. त्याला दरवर्षीच मोठा प्रतिसाद मिळतो. शेतकरी रांगा लावून हे बियाणे खरेदी करतात. याचा उल्लेख करून डॉ. दांगट यांनी कृषी विद्यापीठाचा खरीप मेळावा हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण असून ज्याप्रमाणे वारकरी आषाढी, कार्तिकीला एकत्र येतात. त्याचप्रमाणे या मेळाव्याची वाट मराठवाड्यातील शेतकरी पाहतात असे दांगट म्हणाले. याप्रसंगी प्रास्ताविकात विस्तार शिक्षण संचालक अहिरे यांनी कृषी विद्यापीठाच्या वतीने राबवल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती दिली. स्थापनेपासून आतापर्यंत विद्यापीठाच्या वतीने ११४६ संशोधन शिफारशी तर विविध स्वरूपाचे १५८ वाण शेतकऱ्यांसाठी तयार केल्याचे सांगण्यात आले.

# बीडमध्ये एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन

## रस्त्यांवर एसटीच्या रांगा, प्रवाशांचे हाल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** बीड येथील राज्य परिवहन महामंडळाच्या एसटीतील एका महिला वाहकाला व चालकाला रिक्षाचालकाने मारहाण, धक्काबुक्की केल्याची घटना बीड शहरातील बार्शी नाका परिसरात शनिवारी दुपारी घडली.



या घटनेच्या निषेधार्थ आणि गुन्हा दाखल होईपर्यंत काम सुरू न करण्याचा पवित्रा घेत दुपारनंतर वाहक-चालकांनी काम बंद आंदोलन पुकारल्याने प्रवासी सेवा ठप्प झाली होती.

बाहेरगावहून आलेल्या बस स्थानकाबाहेर दूरपर्यंत रांगेत उभ्या होत्या. या घटनेमुळे प्रवाशांचे मोठे हाल झाले. तर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, सायंकाळनंतर प्रवासी सेवा पूर्ववत झाल्याची माहिती बीडच्या विभाग नियंत्रक अनुजा दुसाने यांनी दिली.

# जालन्यात ड्रोन वापरावर प्रतिबंध

**लोकसत्ता, वार्ताहर**

**जालना :** जिल्ह्यात येत्या तीन जूनपर्यंत ड्रोन किंवा इतर कोणतेही हवाई यंत्र उडविण्यास किंवा वापरण्यास जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकाऱ्यांनी बंदी घातली आहे. जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी १६ मे ते ३ जून दरम्यानच्या कालावधीकरिता हा प्रतिबंधात्मक आदेश लागू केला आहे.

आदेशात म्हटले आहे की, संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत ड्रोन किंवा इतर मानवरहित हवाई यंत्राचा वापर काही असामाजिक तत्त्वांकडून करण्यात येण्याची शक्यता आहे. त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या स्थळांना धोका निर्माण होण्याची तसेच सार्वजनिक शांतता भंग होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा उपकरणांचा अनियंत्रित वापर टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतीय नागरिक सुरक्षा संहितेतील कलमांत असलेल्या तरतुदी अन्वये हा प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यात लागू करण्यात आला आहे. या प्रतिबंधात्मक आदेशाचे उल्लंघन करणारांच्या विरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# अर्धापूरमध्ये सख्ख्या भावाची हत्या

**लोकसत्ता वार्ताहर**

**नांदेड :** शेतीच्या वाटणीवरून भावाने अन्य सहकाऱ्यांच्या मदतीने सख्ख्या भावाची हत्या केल्याचा प्रकार बारड (ता. अर्धापूर) येथे शुक्रवारी घडला. याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे.

बारड येथील रहिवासी राजू जानकीराम देशमुख (वय ४०) व त्याचा भाऊ सूर्यकांत या दोघांमध्ये अनेक दिवसांपासून शेतीचा वाद सुरू होता. त्यातून अनेकदा त्यांच्यामध्ये शाब्दिक चकमक उडाली होती.

पोलीस दप्तरी नोंद झाल्यानुसार शुक्रवारी सायंकाळी सूर्यकांत देशमुख, चंद्रकांत देशमुख, शिल्पा देशमुख व उमेश देशमुख या चौघांनी राजू देशमुख यांच्यावर दगडाने हल्ला केला. त्या हल्ल्यात राजू देशमुख गंभीर जखमी झाले. अधिक रक्तस्राव झाल्याने उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर सहायक पोलीस निरीक्षक संतोष केडासे यांनी पथकासमवेत घटनास्थळी भेट दिली. याप्रकरणी बारड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

# छत्रपती संभाजीनगर भुयारी मार्गात 'अवकाळी'चे पाणी

## शिवाजीनगरमध्ये वाहतूक ठप्प

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील शिवाजीनगर रेल्वेगेटवरील वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी राज्य शासनाने सुमारे २५ कोटी रुपये खर्चून केलेल्या भुयारी मार्गात अवकाळी पावसाचे पाणी घुसले. त्यामुळे वाहतूक ठप्प झाली. पाण्याचा निचरा होत नसल्यामुळे दोन्ही बाजूंनी वाहनधारकांची तारांबळ उडाली. चार किमीचा फेरा मारून संग्रामनगर उड्डाणपुलावरून वाहनधारकांना ये-जा करावी लागली. अखेर अग्निशमन विभागास पंपाच्या साह्याने पाणी उपसा करावा लागला.

शिवाजीनगर रेल्वेगेटवर होणारी वाहतुकीची कोंडी आणि बीड बायपास रोडवरील देवळाई चौकात वाढलेले अपघाताचे प्रमाण यामुळे या ठिकाणी भुयारी मार्ग तयार करण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या छत्रपती संभाजीनगर येथील खंडपीठात जनहित याचिका दाखल करण्यात आली.

उच्च न्यायालयाच्या आदेशावरून राज्य शासनाने जागतिक बँक प्रकल्पाच्या कार्यकारी अभियंता कार्यालयामार्फत भुयारी मार्गाचे काम करण्यात आले. भुयारी मार्गाचे लोकार्पण फेब्रुवारी महिन्यात झाले. त्यानंतर या भुयारी मार्गातून वाहतूक सुरळीत झाली. जड वाहनांना मात्र बंदी घालण्यात आली. रविवारी दुपारी शहरात विजेच्या कडकडाटासह अवकाळी पावसाने हजेरी लावली.



शिवाजीनगरच्या रेल्वे रुळावरून पावसाचे पाणी भुयारी मार्गात आले. चार ते पाच फूट पाणी साचले. या पाण्यातून वाहने जात नसल्याने देवळाई चौक आणि शिवाजीनगर चौकात वाहतूक ठप्प झाली. वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. वाहनधारकांनाही वाहन घेऊन जाण्याची भीती वाटत होती. त्यामुळे भुयारी समोरून वाहने वळविण्यात आली. भुयारी मार्गात माती-दगड वाहून आल्याने सर्वत्र चिखल झाला.


**एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड** (एक शेड्युल्ड कमर्शियल बँक)
AU SMALL FINANCE BANK — A SCHEDULED COMMERCIAL BANK
नोंदणीकृत कार्यालय : १९-ए, धुळेश्वर गार्डन, अजमेर रोड, जयपूर - ३०२००१ (CIN : L36911RJ1996PLC011381)

**परिशिष्ट IV [रुल ८(I) पाहा)] ताबा सूचना**

ज्याअर्थी, **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे (एक शेड्युल्ड कमर्शियल बँक)** प्राधिकृत अधिकारी म्हणून असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट [ॲक्ट, २००२ (२००२चा ५४)] आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२च्या रुल ३ यासह वाचलेल्या सेक्शन १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत याखालील तालिकेत दिलेल्या तपशीलानुसार उक्त सूचनेच्या स्वीकृतीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत उक्त सूचनेमध्ये नमूद केलेल्या रकमेची परतफेड करण्याकरिता ऋणकोंवर फर्माविणारी याखाली नमूद केल्यानुसार तारखे दिवशी मागणी सूचना निर्गमित करण्यात आली आहे.

| ऋणको/ सह-ऋणको/ गहाणकार/ हमीदाराचे नाव/ लोन अका. नं. | १३(२) सूचना तारीख व रक्कम | गहाण असलेल्या मालमत्तेचे वर्णन | ताबा घेतल्याची तारीख |
|---|---|---|---|
| (लोन अका. नं.) **L9001060119189986**, एकवीरा कृषी केंद्र, तिच्या मालकाद्वारा - किरण अशोक पाटील (ऋणको), किरण अशोक पाटील (सह-ऋणको) | ०६-नोव्हें-२४ रु. ३,५४,२२०/- (रुपये तीन लाख चोपन्न हजार दोनशे वीस फक्त) ०६-नोव्हें-२४ रोजीप्रमाणे | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल/ कमर्शियल मालमत्ता/ जमीन/ बिल्डिंग/ स्ट्रक्चर व फिक्चर्स - मालमत्ता येथे स्थित - सीटीएस नं. ५२१, जीपीएच नं. ११८, व्हिलेज - कर्माड, तेहसील - जळगाव, महाराष्ट्र. **मोजमापाची ५४.२ चौ.मी.** **पूर्व** : रोड, पश्चिम : रोड, उत्तर : जीपीएच नं. ११७, दक्षिण : जीपीएच नं. ११९. | १५-मे-२५ |
| (लोन अका. नं.) **L9001060127512288**, बराकू वना जाधव, मालकाद्वारा - बराकू वना जाधव (ऋणको), श्रीमती ज्योती बराकू जाधव (सह-ऋणको), बराकू वना जाधव (सह-ऋणको) | १८-डिसें-२४ रु. ५,००,३६०/- (रुपये पाच लाख तिनशे साठ फक्त) ११-डिसें-२४ रोजीप्रमाणे | पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे - रेसिडेंशियल/ कमर्शियल मालमत्ता/ जमीन/ बिल्डिंग/ स्ट्रक्चर व फिक्चर्स - मालमत्ता येथे स्थित - गट नं. ५/ई/२/ए/२/२, प्लॉट नं. १, चाळीसगाव, जळगाव, हरिओम नगर, जि. जळगाव, महाराष्ट्र. **मोजमापाची १५२ चौ.मी.** | १५-मे-२५ |

ऋणको रकमेची परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत, त्यामुळे ऋणको आणि आम जनतेस याद्वारा सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी वरील तालिकेत नमूद केलेल्या तारखे दिवशी उक्त रुल्सच्या रुल ८ यासह वाचलेल्या उक्त ॲक्टच्या [ॲक्ट २००२] सेक्शन १३(४) अंतर्गत त्याला / तिला प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत वर नमूद केलेल्या तालिकेत वर्णिलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. "सुरक्षित मत्तेच्या उपलब्ध वेळेत, म्हणजेच या सूचनेपासून ३० दिवस, विमोचनाकरिता रुल ८ (६) यासह वाचलेल्या ॲक्टच्या सेक्शन १३च्या सब-सेक्शन (८)च्या तरतुदींकडे ऋणकोचे लक्ष वेधीत आहोत." विशेषकरून ऋणको तसेच आम जनतेस याद्वारा सावध करण्यात येते की, त्यांनी मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेबाबत केलेला कोणताही व्यवहार वरील तालिकेत नमूद केलेली रक्कम व त्यावरील व्याजाकरिता **एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडच्या (एक शेड्यूल्ड कमर्शियल बँक)** आकाराच्या विषयाधीन असणार आहे.

**दिनांक : १७.०५.२०२५** — **स्वाक्षरी/-**
**स्थळ : जळगाव, महाराष्ट्र** — **प्राधिकृत अधिकारी एयू स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड**



**उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक**
UJJIVAN
नोंदणीकृत कार्यालय: ग्रेप गार्डन, क्र. २७, ३रा 'ए' क्रॉस, १८ वा मुख्य, ६वा ब्लॉक, कोरमंगला, बेंगळुरू- ५६००९५, कर्नाटक.
प्रादेशिक कार्यालय: ७वा मजला, अल्मोंटे आयटी पार्क, अ. क्र. ८, खराडी- मुंढवा बायपास, गाव खराडी, पुणे- ४११०१४.

**जाहीर लिलाव सूचना**

सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियम २००२ च्या तरतुदी नियम ८(६) आणि ९ सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी कायदा) २००२ अंतर्गत विक्रीसाठी जाहीर सूचना
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड यांचे अधिकृत अधिकारी म्हणून, निम्नस्वाक्षरीकार यांनी सरफेसी कायद्याच्या कलम १३(४) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारण जनतेला कळविण्यात येते की, बँकेच्या थकबाकी वसूल करण्यासाठी खाली नमूद केलेल्या खात्यातील गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव 'जसे आहे जिथे आहे आधारावर' आणि 'जसे आहे जे आहे आधारावर' येथे खाली नमूद केल्याप्रमाणे तारखेला आयोजित केला जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक/ शाखा | कर्जदार/सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाण ठेवणाऱ्याचे नाव | १३(२) सूचना तारीख/ थकित थकबाकी (रुपयांमध्ये) या रोजीनुसार | ताबा तारीख | आरक्षित किंमत भारतीय रुपयात/ईएमडी भारतीय रुपयात |
|---|---|---|---|---|---|
| १ | ४४७५२१०१३००००० ६९/ ४४७५-भुसावळ | **१) सुनील नीलकंठ पाटील, २) दुर्गा पाटील,** दोघेही राहणार येथे शिवकृपा अपार्टमेंट, वासू इंगळजवळ, सुहास हॉटेलच्यामागे, भुसावळ, जि. जळगाव, महाराष्ट्र-४२५२०१. १) **येथे देखील :** मनिष ट्रॅव्हल, दुकान क्र. १ सी.एस.एम. कॉम्प्लेक्स भुसावळ, जळगाव, महाराष्ट्र- ४२५२०१. २) **येथे देखील:** एलआयसी एजंट, लक्ष्मी कॉम्प्लेक्स, रावेर रोड, सावदा, जळगाव, महाराष्ट्र- ४२५५०१. | १०.०५.२०२४/ रु. १४,७४,१९९.९२ दि. ०६.०५.२०२४ रोजीनुसार | १७.०१.२०२५ | रु.१३,४९,०००/- / रु.१,३४,९००/- |
| | | **स्थावर मालमत्तेचे वर्णन:** फ्लॅट क्र. ०१ चे मोजमाप क्षेत्रफळ ३२.६३५ चौरस मीटर असून बिगरशेती भूखंड क्र. ०४ च्या एकूण ३००.०० चौरस मीटर क्षेत्रफळात ०.२४.८५ चौरस मीटरचा वाटा आहे, सर्वे क्र. १३०/३ ते ७ असलेला हा प्लॉट टी.पी. योजना क्र. १, अंतिम प्लॉट क्र. ६७ अंतर्गत येतो, भुसावळ, ता. आणि जिल्हा, भुसावळ येथे स्थित आणि द्वारे सीमाबद्धः पूर्व: प्लॉट क्र. ०३, पश्चिम: प्लॉट क्र. ०५, उत्तर: प्लॉट क्र. १४-१५, दक्षिण: १८-१९ मीटर रुंदीचा रस्ता, जो सुनील नीलकांत पाटील आणि दुर्गा सुनील पाटील यांच्या मालकीचा आहे. | | | |
| २ | ४४५४२१०१८००००० ०३/ ४४५४-गारखेडा | **१) माधव शंकर हांडे, २) श्रीमती गोदावरी माधव हांडे,** दोघेही येथे राहतात : घर क्र. १२६/२ मातोश्री नगर रांजणगाव शेणपुंजी औरंगाबाद, महाराष्ट्र - ४३११३६. | ०५.०८.२०२३/ रु. १९,०८,९५५.१० दि. ०१.०८.२०२३ रोजीनुसार | १३.१२.२०२४ | रु.१३,३७,०००/- / रु.१,३३,७००/- |
| | | स्थावर मालमत्तेचे वर्णन: मालमत्ता मिळकत क्र. जुना ३३२६, मिळकत क्र. नवीन ७२६०, ६०० चौरस फूट, बिल्ट अप ६०० चौरस फूट, मातोश्री नगर, रांजणगाव शेणपुंजी, ता. गंगापूर, जिल्हा-औरंगाबाद यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, द्वारे सीमाबद्धः पूर्व-१३ फूट रोड, पश्चिम-शेख यांचे घर, दक्षिण-रमेश सातपुते यांचे घर, उत्तर-दत्तात्रय गाताडे यांचे घर. | | | |

**मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ :: दि. ०२-०६-२०२५ आणि २०-०६-२०२५ सकाळी ११ वा. ते दुपारी ४ वा. दरम्यान**
**बोली आणि ईएमडी सादर करण्याची तारीख :: दि. २४.०६.२०२५ रोजी सकाळी ११ वा. ते सायं. ५ वाजेपर्यंत**
**लिलावाची तारीख आणि वेळ :: दि. २५.०६.२०२५ रोजी सकाळी ११.०० वा. ते दुपारी २.०० वा.पर्यंत**

**इसारा अनामत रक्कम (ईएमडी) भारतीय रुपयात ('उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड' यांच्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारे भरावी),**
**बोली आणि लिलाव सादर करण्याचे ठिकाण:** १) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., निरंजन कॉम्प्लेक्स जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेसमोर, रिंग रोड, जळगाव जळगाव, महाराष्ट्र- ४२५००१ **अ. क्र. १ यासाठी (दीपक मंत्री -९५६११५७७५७, धीरज रणगाडे -९५१८५५४६८८ यांच्याशी संपर्क साधा).**
२) उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि., तळमजला, रेणुका प्रसाद बिल्डिंग क्र.७०, सारंग सोसायटी गजानन महाराज मंदिर स्क्वेअर गारखेडे रोड, औरंगाबाद छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र- ४३१००५ **अ. क्र. २ यासाठी (कृष्ण सिंह - ७७६७८४७५८४, भक्ती नेना - ९२२४४७१४९४ यांच्याशी संपर्क साधा).**

**अटी आणि शर्ती:-** ई-लिलाव 'जसे आहे जिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे ते' या तत्त्वावर आयोजित केला जात आहे.
१. अधिकृत अधिकाऱ्याच्या ज्ञानानुसार आणि माहितीनुसार, कोणत्याही मालमत्तेवर कोणताही भार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी त्यांची बोली सादर करण्यापूर्वी, भार, लिलावात ठेवलेल्या मालमत्तेचे मालकी हक्क आणि मालमत्तेवर परिणाम करणारे दावे/ हक्क/ देयके याबद्दल स्वतःची स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलावाची जाहिरात बँकेचे कोणतेही वचनबद्धता किंवा प्रतिनिधित्व दर्शवत नाही आणि ती मानली जाणार नाही. बँकेला ज्ञात असो वा अज्ञात, सर्व विद्यमान आणि भविष्यातील भारांसह मालमत्ता विकली जात आहे. अधिकृत अधिकारी/सुरक्षित धनको कोणत्याही तृतीय-पक्षाच्या दाव्यांसाठी /हक्क/ देयकेसाठी कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.
२. बोली सादर करण्यापूर्वी मालमत्ता आणि तपशीलांची तपासणी करणे आणि स्वतःची खात्री करणे ही बोलीदारांची जबाबदारी असेल. प्रत्येक मालमत्तेच्या वर्णनासमोर नमूद केलेल्या ठिकाणी इच्छुक बोलीदारांना लिलावात ठेवलेल्या मालमत्तेची तपासणी करण्याची परवानगी दिली जाईल.
३. इच्छुक बोलीदारांनी वर नमूद केल्याप्रमाणे लिलावाच्या तारखेच्या एक दिवस आधी निम्नस्वाक्षरीकार असलेल्या अधिकृत अधिकाऱ्यासमोर त्यांची बोली सादर करावी.
४. उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक, मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा प्रदाता - मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, यांच्याद्वारे ई-लिलाव आयोजित केला जाईल. संपर्क व्यक्ती - प्रभाकरन एम - (मोबा. क्र. ७४१८२८१७०९). इच्छुक बोलीदारांना वेबसाइटवरील मालमत्तेची माहिती मिळविण्यासाठी https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions ला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे आणि बोलीमध्ये भाग घेण्यासाठी त्यांनी https://www.bankeauctions.com या पोर्टलवर त्यांची नावे नोंदणी करावीत आणि त्यांचा वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवावा. संभाव्य बोलीदार सेवा प्रदाता मेसर्स सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेडकडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. हेल्पलाइन क्र. - ७२९११९१८८२४, २५, २६ सपोर्ट ईमेल आयडी:- support@bankeauctions.com, लिलाव पोर्टल - https://www.bankeauctions.com.
५. सुरक्षित धनको, म्हणजेच, उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि. यांनी बोली स्वीकारल्याच्या अधीन राहून, सर्वाधिक बोली लावणाऱ्या/प्रस्ताव केलेल्याला मालमत्ता विकली जाईल. तथापि, आवश्यक वाटल्यास आंतर-से बोली लावण्याची परवानगी देण्याचा पूर्ण अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांना आहे. अधिकृत अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता कोणताही प्रस्ताव/ निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार आहे.
६. यशस्वी बोलीदाराची इसारा ठेव अनामत (ईएमडी) अंशतः विक्रीच्या मोबदल्यात ठेवली जाईल आणि अयशस्वी बोलीदारांची ईएमडी परत केली जाईल. इसारा ठेव अनामत यावर कोणतेही व्याज असणार नाही. यशस्वी बोलीदाराला अधिकृत अधिकाऱ्याने बोली किंमत स्वीकारल्यापासून २४ तासांच्या आत विक्री किमतीच्या २५% रक्कम, आधीच भरलेली ईएमडी समायोजित करून आणि उर्वरित ७५% रक्कम विक्रीच्या १५ व्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा अधिकृत अधिकाऱ्याने लेखी स्वरूपात मान्य केलेल्या आणि केवळ त्यांच्या विवेकबुद्धीनुसार अशा वाढीव कालावधीत, कोणत्याही परिस्थितीत ३ महिन्यांपेक्षा जास्त नसलेल्या कालावधीत जमा करावी लागेल. यशस्वी बोलीदाराने पैसे देण्यास कसूर केल्यास, प्रस्तावाद्वारे आधीच जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि मालमत्तेचा पुन्हा लिलाव केला जाईल आणि कसूर करणाऱ्या खरेदीदाराचा मालमत्तेवर/ रकमावर कोणताही दावा/ हक्क राहणार नाही.
७. प्रकाशन फोर्स मेजर कलमाच्या विषयाधीन आहे.
८. बोलीदाराच्या स्वतःच्या हितासाठी शेवटच्या क्षणी बोली लावणे टाळावे कारण उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक किंवा सेवा प्रदाता कोणत्याही चुका/ बिघाडासाठी (इंटरनेट बिघाड/वीज बिघाड, इ.) जबाबदार राहणार नाहीत. अशा आकस्मिक परिस्थिती टाळण्यासाठी, बोलीदारांना वीज पुरवठा बॅक-अप इत्यादी सर्व आवश्यक व्यवस्था/पर्याय करण्याची विनंती केली जाते, जेणेकरून ते अशा परिस्थिती टाळू शकतील आणि लिलावात यशस्वीरित्या सहभागी होऊ शकतील.
सदर ही वरील नामे कर्जदारांना/जामीनदारांना/गहाण ठेवणाऱ्यांना गहाण ठेवलेल्या मालमत्तेच्या विक्रीसाठी नियोजित जाहीर लिलावाबद्दलचीदेखील सूचना आहे.

ठिकाण: औरंगाबाद, — सही/-अधिकृत अधिकारी,
दिनांक: १७.०५.२०२५. — उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक



GRIHUM
**गृहम हाऊसिंग फायनान्स लि.** (आधी पुनावाला हाऊसिंग फायनान्स लि., म्हणून ओळखले जाणारे)
नोंदणीकृत कार्यालय: ६वा मजला, बी बिल्डिंग, गंगा टुएनो, लोहेगाव, पुणे, महाराष्ट्र ४११०१४ शाखा कार्यालय युनिट: ३रा मजला, काकडे टॉवर, सुतगिरणी रोड, पोतदार इंटरनॅशनल स्कूलसमोर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र - ४३१ ००५
**ई-लिलाव - विक्री सूचना सरफेसी कायद्यांतर्गत सुरक्षित स्थावर मालमत्तेची विक्री**

**सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ आणि ९ सहवाचता सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ ('कायदा') अंतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.**
सूचना सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणाऱ्यांना/जामीनदार यांना देण्यात येत आहे की, **गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (आधी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून पूनावाला हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि दि. १७ नोव्हेंबर २०२३ रोजीपासून (आधी मॅग्मा हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आणि मूळतः जीई मनी हाऊसिंग फायनान्स पब्लिक अनलिमिटेड कंपनीच्या नावाने समाविष्ट केलेल्या)** बदलून गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड करण्यात आल्या आहेत), यांना गहाण ठेवलेल्या खाली वर्णन केलेल्या स्थावर मालमत्ता (यापुढे कायद्यानुसार 'सुरक्षित धनको' म्हणून संदर्भित), ज्याचा ताबा निर्देशित कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत सूचनेनुसार सिक्युरिटी इंटरेस्ट (अंमलबजावणी) नियमाच्या नियम ८ आणि ९ सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम १३(१२) अंतर्गत, अधिकारांचा वापर करून सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने घेतला आहे. सुरक्षित मालमत्ता **दि. ०४.०६.२०२५** रोजी ई-लिलावाद्वारे **'जसे आहे तिथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जे काही आहे तेथे आहे'** या तत्त्वावर विक्री करण्यात येतील. सर्वसामान्यांना कळविण्यात येते की, आम्ही **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटवर प्रदान केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे जाहीर लिलाव करणार आहोत. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, कृपया जीएचएफएल/सुरक्षित धनको यांच्या वेबसाइटवर, म्हणजेच **www.grihumhousing.com** यामध्ये प्रदान केलेल्या लिंकचा संदर्भ घ्या.

| अ. क्र. | प्रस्ताव क्र. ग्राहक नाव (A) | मागणी सूचना तारीख आणि थकबाकी रक्कम (B) | ताब्याचे स्वरूप (C) | मालमत्तेचे वर्णन (D) | आरक्षित किंमत (E) | ईएमडी (आरपीच्या १०%) (F) | ईएमडी सादर करण्याची तारीख (G) | वाढीव बोली (H) | मालमत्तेची तपासणी तारीख आणि वेळ (I) | लिलावाची तारीख आणि वेळ (J) | ज्ञात भार/ न्यायालयीन प्रकरणे असल्यास (K) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **कर्ज क्र. एचएम०२१० एच१८१०००३२ प्रमोद दत्तात्रय उगवे (कर्जदार) भारती उगवे** | सूचना तारीख: ०७/०८/२०२४ एकूण देयके: रु. १९१०१४७/- (रुपये एकोणीस लाख दहा हजार एकशे सत्तेचाळीस फक्त) दि. ०७/०८/२०२४ रोजीनुसार देय, वसूल होईपर्यंत वार्षिक १३% व्याजासह. | भौतिक | विंग १ मध्ये दुसऱ्या मजल्यावर फ्लॅट क्र. ०९, ई टाईप इमारत मोजमापे ५१.१७ चौरस मीटरचे कार्पेट क्षेत्रफळ, सारा परिवर्तन सेक्टर-बी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रकल्पात स्थित, फेज-१, गट क्र. २३४/२/पी वर बांधलेले, सावंगी, औरंगाबाद यांचे ते सर्व तुकडे आणि पार्सल, विक्री करारात विशेषतः उल्लेख केलेला, ज्याची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे: पूर्व:- फ्लॅट क्र. १०, विंग क्र. ०१, पश्चिम:- साईड मार्जिनल स्पेस, दक्षिण: फ्लॅट क्र. ०८, विंग क्र. ०१, आणि डक्ट, उत्तर: साईड मार्जिनल स्पेस. | रु. १७,००,०००/- (रुपये सतरा लाख फक्त) | रु. १,७०,०००/- (रुपये एक लाख सत्तर हजार फक्त) | दि. ३०.०५.२०२५ रोजी सायं. ५ वाजेपूर्वी | १०,०००/- | २६.०५.२०२५ (सकाळी ११ वा. ते दुपारी ४ वा.) | ०४.०६.२०२५ (सकाळी ११ वा. ते दुपारी २ वा.) | शून्य |

इच्छुक बोलीदार/खरेदीदारांना सुरक्षित कर्जदार शाखा आणि लिलाव मालमत्तेला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे, आणि बोली सादर करण्यापूर्वी स्वतः चौकशी करावी आणि अतिरिक्त शुल्क, भार आणि कोणत्याही तृतीय पक्षाच्या हितसंबंधांची पडताळणी करावी आणि त्यासंबंधी सर्व बाबींमध्ये स्वतःचे समाधान करावे. मालमत्ता कर, वीज/पाणी देयके आणि यशस्वी बोलीदाराने निश्चित करावयाच्या आणि भरावयाच्या मालमत्तेशी जोडलेले सर्व वैधानिक देयके, जर असतील तर. इच्छुक बोलीदारांनी पोर्टलवर स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे आणि लॉगिन आयडी आणि पासवर्ड लिलाव सेवा प्रदात्या, सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता- प्लॉट क्र.-६८, ३रा मजला, गुडगाव, हरियाणा- १२२००३ यांच्याकडून आगाऊ घेणे आवश्यक आहे, जे ई-बिडिंगसाठी अनिवार्य आहे. हेल्पलाइन क्र. - ७२९११९८११२४,२५,२६ सपोर्ट ईमेल आयडी – Support@bankeauctions.com. संपर्क व्यक्ती – धरणी पी, ईमेल आयडी- dharani.p@c1india.com संपर्क क्र.- ९९४८१८२२२२. कृपया लक्षात ठेवा की संभाव्य बोलीदार त्यांच्याकडूनच ई-लिलावाचे ऑनलाइन प्रशिक्षण घेऊ शकतात. इच्छुक खरेदीदार/ बोलीदाराने 'गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड', बँक-आयसीआयसीआय बँक लिमिटेड यांच्या खात्यात एनईएफटी/ आरटीजीएस/डीडी याद्वारे इसारा ठेव अनामत (ईएमडी) ची रक्कम जमा करणे आवश्यक आहे, खाते क्रमांक-०००६५१०००४६० आणि आयएफएससी कोड- आयसीआयसी००००००६, २०, आर. एन. मुखर्जी रोड- कोलकाता - ७००००१ कोणत्याही राष्ट्रीयीकृत किंवा अनुसूचित बँकेत किंवा दि. ३०.०५.२०२५ पूर्वी काढलेले आणि https://www.bankeauctions.com यावर त्यांचे नाव नोंदणीकृत करा आणि वापरकर्ता आयडी आणि पासवर्ड मोफत मिळवा आणि सेवा प्रदात्याकडून ई-लिलावाचे प्रशिक्षण घ्या. वेबसाइटवर नोंदणी केल्यानंतर, इच्छुक खरेदीदार/बोलीदाराने खालील कागदपत्रांच्या प्रती अपलोड करून, ईमेलद्वारे आणि स्व-साक्षांकित हार्ड कॉपी या पत्त्यावर पाठवून मिळवणे आवश्यक आहे: **३रा मजला, काकडे टॉवर, सुतगिरणी रोड, पोतदार इंटरनॅशनल स्कूलसमोर, छत्रपती संभाजीनगर, महाराष्ट्र - ४३१००५ मोबाईल क्र. +९१ ९६५७४४३०७३ ई-मेल आयडी rohan.savala@grihumhousing.com ई-लिलावात भाग घेण्यासाठी कृपया https://www.bankeauctions.com आणि www.grihumhousing.com ला भेट द्या.**
**सदर ही सूचना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम-२००२ च्या नियम ८(६) अंतर्गत कर्जदार/सह-कर्जदार/गहाण ठेवणारे/जामीनदार यांना १५ दिवसांची सूचना म्हणूनदेखील विचारात घेतली पाहिजे.**

दिनांक: १९.०५.२०२५ ठिकाण: औरंगाबाद — सही/- अधिकृत अधिकारी, गृहम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (आधी पूनावाला हाऊसिंग फायनान्स लि., म्हणून ओळखले जाणारे)